# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०　　　　　　　　　　दि.१८ मार्च,२०२०

**बातमी:-१**

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) राज्य शासनाने कोरोनो विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यार्थ्यांना दि.३१ मार्च पर्यंत सुट्या जाहीर केल्या आहेत तर प्राध्यापकांना घरी राहून कामकाज करण्याची मुभा दिली आहे. या पार्श्वभुमीवर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थ्यांना घर बसल्या शिक्षण व्यवस्थापन प्रणालीद्वारे अभ्यासक्रमाचे व्हिडीओद्वारे व्याख्यान व प्रश्नसंच उपलब्ध करुन दिले आहेत. अशा प्रकारे कमी कालावधीत विद्यार्थ्यांना ही सोय उपलब्ध करुन देणारे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

कोरोनो विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी १६ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत शैक्षणिक विभागांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. प्राध्यापकांना देखील २५ मार्च पर्यंत घरी राहून कामकाज करण्याची मुभा दिली आहे. प्राध्यापकांना सुटी दिल्यामुळे घरुन ते कसे काय कामकाज करणार असा प्रश्न अनेकांना पडणे स्वाभाविक आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने या प्रश्नाला चोख उत्तर दिले आहे. विद्यापीठाने मूडल साफ्टवेअरचा वापर करुन विद्यापीठाच्या संगणक केंद्राच्या सहकार्याने स्वत:ची शिक्षण व्यवस्थापन प्रणाली (लर्निग मॅनेजमेंट सिस्टीम) विकसित केली याद्वारे विज्ञान, शिक्षणशास्त्र, सामाजिकशास्त्र, बहिस्थ: शिक्षण अभ्यासक्रमाचे जवळपास २० व्हिडीओ या प्रणालीवर अपलोड करण्यात आले असून स्वत: प्राध्यापकांनी जवळपास ४५ मिनीटे ते १ तास ही अभ्यासक्रमाची व्याख्याने दिली आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांना बहुविध प्रश्नसंच देखील उपलब्ध करुन देण्यात आले असून

१०५ विषयांचे ११ हजार प्रश्न या संचामध्ये असून विद्यार्थ्यांनी घरबसल्या संगणकावर हे प्रश्न सोडविण्याचा सराव करावयाचा आहे.

विशेष म्हणजे मंगळवारी विद्यापीठ प्रशाळांमधील जवळपास १हजार ६०० विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक ई-मेलद्वारे या प्रणालीची लिंक (http://14.139.120.185) कळविली आहे. विद्यार्थ्यांच्या संपर्कात याकाळात प्राध्यापक राहून ई-मेलद्वारे त्यांच्या शंकाचे निरसन देखील करू शकतात. येत्या एक/दोन दिवसात अजून काही व्याख्याने अपलोड केली जाणार आहेत. विद्यापीठाने यापूर्वीच गुगल क्लासरुम वर्कशॉपचे आयोजन केले होते. जवळपास ७ कार्यशाळा या संदर्भाने घेण्यात आल्या असून प्राध्यापक देखील त्याचा उत्स्फूर्तपणे वापर करीत आहेत.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या अभिनव उपक्रमासाठी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, नॅकचे संचालक प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांच्या सहकार्याने संगणक केंद्राचे दाऊदी हुसेन, प्रा.समीर नारखेडे, प्रा.मनोज पाटील यांनी ही प्रणाली विकसीत केली आहे.

## बातमी:-२

---

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित विद्यार्थी विकास प्रोत्साहनपर गुण मागणी अर्ज व याद्या स्वीकृती कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे.

राज्यात कोरोना विषाणू चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दि.२३ मार्च पासून डॉ.आण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव येथे आयोजित विद्यार्थी विकास उपक्रम

संयोजकत्व हिशेब तपासणी, केंद्रीय पध्दतीने लेखे व अध्यादेश तरतुदी अंतर्गत प्रोत्साहनपर गुण मागणी अर्ज व याद्या स्वीकृती कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे. कार्यक्रम आयोजनाबाबत संभाव्य कालावधी शासन निर्देशानुसार ई-मेलद्वारा कळविण्यात येणार आहेत. असे प्रभारी संचालक डॉ.पंकजकुमान नन्नवरे यांनी कळविले आहे.

---

## बातमी:-३

जळगाव दि.१८ (                    ) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपयायोजना म्हणून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना विद्यापीठात येण्याची गरज पडू नये यादृष्टीकोनातून बहुसंख्य कामे ऑनलाईन सुरु केली आहेत.

प्राचार्य/ संचालक यांनी महाविद्यालयील कर्मचाऱ्यांना परीक्षा विषयक विद्यार्थ्यांशी संबंधित परीक्षा अर्ज, गैरप्रकारातील परीक्षा अर्ज, संधीचे अर्ज, प्रवेशपत्र दुरुस्ती आदी सारख्या कामकाजासाठी कर्मचाऱ्यांना विद्यापीठात न पाठवता हे कामकाज ऑनलाईन पध्दतीने ई-मेलद्वारे करावे. या कामकाजाच्या पत्रव्यवहारासाठी kbcnmuexamonline@gmail.com या ई-मेल आयडीचा उपयोग करावा. या कामकाजासाठी आवश्यक शुल्क हे महाविद्यालयांनी एनईएफटी/आरटीजीएस या सुविधेद्वारा Central Bank of India Branch Code NMU284435, Account No. 3184541255, IFSC code CBIN0284435 या विद्यापीठाच्या खात्यावर जमा करावे. सोबत विद्यार्थ्यांची कागदपत्रे स्कॅन करुन पाठवावीत असे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी कळविले आहे.

---

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी